## <u>नियमीत दिवाणी दावा क्र.१९१/२०२५ – निशाणी २० खालील आदेश</u>

भारत पोपट काशिद वि. नाना मारुती काशिद इ.

CNR NO. MHSO20–000940–2025

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन असे की, सदरहू दाव्याचे कामकाज चालु असताना यातील प्रतिवादी क्र.१अ, १ब व प्रतिवादी क्र.२ यांनी दि.१०/०६/२०२५ रोजी दावा मिळकतीचे खरेदीखत संतोष एकनाथ काशिद यांचे नावाने अस्तित्वात आणलेले आहे. त्यामुळे सदर दाव्यामध्ये खरेदीदार यांना प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणे व सदर बेकायदेशीर दस्ताबाबतचा मजकुर दाव्यात नमूद करणे न्यायाचेकामी आवश्यक व गरजेचे झालेले आहे. सबब वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र.२ नंतर संतोष एकनाथ काशिद यांना अर्जात नमुद केलेप्रमाणे सामिल करण्यास तसेच दावा कलम २ नंतर अर्जात नमूद केलेप्रमाणे '२अ' हा मजकूर, दावा कलम ६ब नंतर अर्जात नमूद केलेप्रमाणे 'ब१' हा मजकूर नमूद करण्यास व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. सदर दुरुस्ती केलेस दाव्याचे आशयात व विषयात कसलाही बदल होत नाही. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादी तर्फे म्हणणे मांडले की, वादी यांचा अर्ज चुकीचा व बेकायदेशीर असुन प्रस्तुत दाव्याचे कामी मुळीच प्रस्तुत अर्जाप्रमाणे दुरुस्ती करता येणार नाही. वादी यांनी प्रस्तुत अर्ज कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन करुन दिलेला असून अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. प्रसतुत दुरुस्ती अर्जाप्रमाणे दुरुस्ती झालेस दाव्याचा आशय व विषय बदलत असून त्यामुळे वादीचा प्रस्तुत दुरुस्ती अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादीचे अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द डिक्लेरेशनचा व निरंतर ताकीदीचा दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांनी संतोष एकनाथ काशिद यांना दाव्यात सामिल करण्याची व दावा दाखल केलेला असताना दावा मिळकतींच्या झालेल्या दस्ताबाबत दुरुस्तीस परवानगी मिळण्याची विनंती केली. प्रस्तुतची दुरुस्ती प्रतिवादी क्र.१अ, १ब व २ यांनी

दि.१०/०६/२०२५ रोजी संतोष एकनाथ काशिद यांचे नावाने अस्तित्वात आणलेल्या खरेदीखताच्या अनुषंगाने आहे. सदरची दुरुस्ती होणे अत्यंत जरूरीचे आहे. तसे न झाल्यास वादीचे कधीही न भरून येणारे फार मोठे नुकसान होणार आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे आशयात व विषयात कसलाही बदल होत नाही. त्यामुळे सदर दाव्यात वादीने मागितलेली दुरुस्ती करणे जरुरीचे आहे.

६. सदर दुरुस्ती पुरावा सुरु होण्यापूर्वी मागितली आहे. सदर दुरुस्ती तांत्रिक स्वरूपाची आहे. सदरची दुरुस्ती होणे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे त्याला अनुषंगून वादीने मागितलेली मागणी मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेकरीता वादीने मागणी केलेली दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरील दुरुस्तीमुळे दाव्याच्या आषयात व विषयात कोणताही बदल होणार नाही. ही सर्व परिस्थीती पहाता अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यातील गुंता टाळण्यासाठी सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो –

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज (नि.२०) मंजूर करण्यात येतो.

२. सदर आदेशाच्या दिनांकापासून वादी यांनी अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती करुन, दुरुस्ती प्रत १४ दिवसांचे आत हजर करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.09.23 13:27:49 +0530

सांगोला. (श्रीमती पी. आर. कुलकर्णी)
दिनांक: २३/०९/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Civil Judge, J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 23/09/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 23/09/2025 |